# राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा

**सन- २०२३-२०२४**

## "Mission Towards Excellence"
## "माझी संस्था - स्वच्छ, सुंदर, हरित संस्था"


**सादरकर्ता - डॉ. राजेंद्र भिमराव महाजन**

अधिव्याख्याता,

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नंदुरबार


**स्पर्धा गट- अध्यापकाचार्य व पर्यवेक्षीय अधिकारी**


**मार्गदर्शक- डॉ. जगराम ओंकार भटकर**

प्राचार्य,

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नंदुरबार




# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | |
| २ | नवोपक्रमाचे शिर्षक | |
| ३ | नवोपक्रमाची गरज | |
| ४ | नवोपक्रमाचे महत्त्व | |
| ५ | नवोपक्रमाची उद्‌दिष्टे | |
| ६ | नवोपक्रम नियोजन व कार्यवाहीचे टप्पे | |
| ७ | प्रत्यक्ष कार्यवाही कृतीकार्यक्रम व उपचारात्मक उपाययोजना | |
| ८ | टप्प्यानुसार उपचारात्मक उपाययोजनांची फलनिष्पत्ती | |
| ९ | समारोप | |
| १० | संदर्भसूची | |
| ११ | परिशिष्टे - १ ते १४ | |
| १२ | नवोपक्रमाबाबत निवडक अभिप्राय | |
| १३ | प्रतिज्ञापत्र | |
| १४ | मा.प्राचार्यांचे प्रमाणपत्र | |
| १५ | बदलातून विकासाकडे, विकासाकडून समृद्‌धीकडे | |
| १६ | विविध प्रसार माध्यमांनी घेतलेली दखल | |
| १७ | संदर्भ परिशिष्टे कागदपत्रे | |
| १८ | ---- | |

## प्रस्तावना

आपल्या संस्थेचा/कार्यालयाचा परिसर स्वच्छ, सुंदर व हिरवागार असावा, त्यात विविध भौतिक सुविधांसह उत्तम इमारत असावी हे शासन दरबारी कार्यरत प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांचे स्वप्न असते. कारण शासन दरबारी कार्यरत प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांचा १/३ पेक्षा जास्त कालावधी कार्यालय व परिसरात व्यतीत होतो. कार्यालयातील वातावरण स्वच्छ, सुंदर व पोषक असल्याने कार्यक्षमता वाढून त्याचा फायदा निश्चीतपणे प्रशासनास व सबंधित घटकांना, सामान्य जनतेस होतो. तसेच यामुळे प्रशासन उत्तरदायी, सुलभ, स्वच्छ, पारदर्शी आणि गतिमान बनण्यास मदत होते. याबाबींचा विचार करता शासकीय संस्थांचे/ कार्यालयांचे आंतर्बाह्य रूप बदलवून प्रशासनास गती देणे, प्रशासनात कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांच्यात सकारात्मक बदल घडवून आणणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र शासनाने सामान्य प्रशासन विभागातील दि. १८ मे २०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार “सुंदर माझे कार्यालय” अभियान राबविण्याची बाब शासनस्तरावर विचाराधीन होती.

प्रत्येक कार्यालय हे स्वच्छ, सुंदर व नीटनेटके असावे, तेथील वातावरण नागरिकांसाठी सुलभ व कर्मचाऱ्यांसाठी काम करण्यास योग्य, प्रेरक, उत्साहवर्धक असावे यासाठी “सुंदर माझे कार्यालय” अभियान राबवण्याची बाब शासन स्तरावर मान्यता दिली.

निसर्ग, सातपुड्याच्या पर्वत रांगा आणि आदिवासी संस्कृतीचा पारंपारिक वारसा असलेला नंदुरबार जिल्हा हा आदिवासी बहुल, आदिवासी दुर्गम जिल्हा म्हणून ओळखला जातो. नंदुरबार जिल्ह्याची निर्मिती दि.०१ जुलै १९९८ रोजी झाली असून यात ६ तालुके आहेत. नंदुरबार जिल्ह्यात शालेय शिक्षणाच्या सक्षमीकरणासाठी सन २०११ मध्ये जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नंदुरबार या शासकीय कार्यालय सुरु झाले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत संस्थेने संस्थेच्या ६३ आर (१.५ एकर) शासकीय जागेतील नवीन वास्तूत इमारतीत दि. २६ नोव्हेंबर २०१८ ला उद्घाटन करून प्रवेश केला. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नंदुरबार संस्थेची सदरची जागा म्हणजे टेकडी, कठीण मुरूम, दगड गोटे असलेली नापीक जमीन आहे. यात इमारत मोठ्या डौलाने उभी असून जिल्ह्यात शिक्षण सक्षमीकरणाचे कार्य सुरु झाले आहे.

“भौतिक सुविधा” विभागाचा प्रमुख म्हणून संस्थेतील सुविधा आणि समस्या, उणिवांचा शोध घेतला. संस्थेच्या ६३ आर (१.५ एकर) शासकीय जागेत फक्त ५ झाडे/रोपटे जेमतेम दिसत होती. इमारतीच्या आजूबाजूला सर्वत्र ओसाड व निर्जीव जागा मनाला आव्हान देत होती. यातूनच संस्थेच्या भौतिक विकासासाठी आवश्यक उपाययोजनांसाठी एक कालबद्ध व गतिमान कार्यक्रम हाती घेतला... **“Mission Towards Excellence” “माझी संस्था - स्वच्छ, सुंदर, हरित संस्था”....**

## नवोपक्रमाचे शीर्षक

**“Mission Towards Excellence”**

**“माझी संस्था - स्वच्छ, सुंदर, हरित संस्था”....**

## नवोपक्रमाची गरज

"गरज शोधाची जननी असते, गरज नवनिर्मितीची माता असते" असे म्हणता येईल. नवनिर्मित नंदुरबार जिल्ह्यातील नवनिर्मित जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नंदुरबार या कार्यालयाची नवीन जागेतील नवनिर्मित इमारत वास्तूत, नवीन संसार मांडताना येणाऱ्या अडचणींवर मात करतात तसे नवीन इमारतीसोबत आवश्यक इतर भौतिक सुविधा निर्माण करण्याचे कार्य सुरूच होते. परंतु आदिवासी, दुर्गम व निसर्गाने समृद्ध असलेल्या जिल्ह्याचे कार्यालयास देखील निसर्ग सौंदर्य प्राप्त व्हावे असे मनापासून वाटत होते.

त्यानुषंगाने मा.प्राचार्य डॉ. जगराम भटकर सो. आणि सर्व सहकारी अधिकारी यांच्या सहविचार सभेत संस्थेच्या परिसराचे सुशोभीकरण व्हावे असा विचार मी व्यक्त केला. सोबतच संस्थेतील उणीवा आणि समस्यांबद्दल सविस्तर चर्चा करण्यात आली. सर्वानीच आपली अनुकूल व प्रतिकूल मते विचार, अनुभव मांडले. एकंदर काय तर यापूर्वी देखील दोन वेळा जेसीबी आणून वृक्षारोपणासाठी खड्डे खोदणे आणि जागा सपाट करणे याकामी श्रम आणि पैसा खर्च झाला होता. खडकाळ, कठीण मुरूम असलेल्या जमिनीत जेसीबी **(JCB)** देखील काम करत नाही, त्यामुळे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आउटपुट मिळत नाही. असे थोडी नैराश्य वजा अनुभवी मार्गदर्शन मिळाले.

संस्थेच्या कार्यालयातील व परिसरातील विविध बाबी जाणून संदर्भीय समस्या, उणीवांचा शोध घेऊन हे **"Mission Towards Excellence"** **"माझी संस्था - स्वच्छ, सुंदर, हरित संस्था"....** हे ब्रीदवाक्य निश्चित केले. संस्थेत भौतिक सुविधा उत्तम प्रकारच्या असल्यास, परिसर स्वच्छ व सुंदर असल्यास जिल्ह्याचे शैक्षणिक मातृत्व लाभलेल्या संस्थेस अधिक गतिमानपणे, दर्जेदारपणे कार्य करता येईल. येथील वातावरण हे अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, प्रशिक्षक, प्रशिक्षणार्थीसाठी योग्य प्रेरक, उत्साहवर्धक व आदर्श असावे या दृष्टिकोनातून या उपक्रमाची गरज होती.

जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेतील अधिकारी जिल्ह्यातील शाळांना भेटी देत असतात, त्यावेळी गुणवत्तेसोबतच भौतिक सुविधा, शालेय परिसर स्वच्छता, वृक्षारोपण, परसबाग इत्यादी बाबीं विषयक मार्गदर्शन करतात, त्यावेळी आपल्याच संस्थेत मात्र या बाबींचा अभाव असणे हे देखील एक चिंतादायी, विचार प्रवर्तक बाब होती. मुख्य रस्त्यापासून संस्थेचा इमारतीपर्यंत जाण्यासाठी आणि वाहन लावण्यासाठी सपाट व व्यवस्थित जागा असू नये इ. याबाबी वेदनादायी होत्या. या अनेक समस्या आणि उणिवांवर अल्पावधीत उपाययोजना करण्याचा सांघिक कृती कार्यक्रमासाठी या नवोपक्रमाची गरज निर्माण झाली. म्हणूनच विविध गरजांपोटी **"Mission Towards Excellence"** **"माझी संस्था - स्वच्छ, सुंदर, हरित संस्था"....** या नवोपक्रमाची निर्मिती करण्यात आली.

## नवोपक्रमाचे महत्त्व

जिल्ह्याचा सर्वांगीण विकास या दृष्टिकोनातून मनुष्यबळ विकसनशील नंदुरबार जिल्हा. जिल्ह्याच्या मनुष्यबळ विकासाची जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था या दोन्ही अंगाने जबाबदारी असणारी आपली मातृसंस्था. संस्थेतील सर्व मानवी व भौतिक घटक त्या दृष्टिकोनातून महत्वाचे आहेत. शिक्षण विभागासोबत जिल्ह्यातील सर्वच विभागाची मनुष्यबळ सेवा हे

आपल्या या संस्थेचे काम तेव्हा संस्थेचा भौतिक भाग सर्वांनाच आदर्श असावा म्हणून **"Mission Towards Excellence" "माझी संस्था - स्वच्छ, सुंदर, हरित संस्था"....** या नवोपक्रमाचे महत्व खालीलप्रमाणे होय.

१. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये शिक्षणाचा गुणवत्तेसोबतच दर्जेदार शैक्षणिक संकुल आणि भौतिक सुविधासह स्वच्छ, सुंदर परिसर, परिसर स्वच्छता आणि निसर्गता निर्माण करण्यास देखील प्रामुख्याने महत्व दिले आहे.

२. महाराष्ट्र शासनाने देखील शासन निर्णय दि. १८ मे २०२१ अन्वये, "सुंदर माझे कार्यालय" या निर्माण करण्यास मान्यता दिली आहे अभियान राबवण्यास मान्यता दिली.

३. केंद्रशासनाच्या सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पीय धोरणानुसार शिक्षक प्रशिक्षण दर्जेदार होण्यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांचे सक्षमीकरण करण्यास प्राधान्य देण्यात आले आहे.

४. केंद्रशासनाच्या शिक्षण मंत्रालयाच्या शैक्षणिक धोरणानुसार शिक्षक प्रशिक्षण संस्थांना दर्जेदार व उत्कृष्ट करण्यासाठी विशिष्ट निधी (१५ कोटी) उपलब्ध करून दिला जाणार आहे. त्यासाठी असलेल्या पडताळणीत ६० पेक्षा अधिक गुण मिळवणे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांना आवश्यक आहे.

५. दैनंदिन कार्यात संस्थेतील बहुतेक सुविधांची कमतरता व उणीवा कमी करून अथवा नष्ट करून नाविन्यपूर्ण कृतीकार्यक्रम राबवून संस्थेच्या परिसर व कार्यालय सुंदर, सुशोभित करण्यासाठी आणि प्रेरक व उत्साहवर्धक वातावरण निर्मितीच्या दृष्टीने देखील नवोपक्रमाचे महत्त्व आहे.

६. जिल्ह्याचे शैक्षणिक मातृत्व लाभलेल्या संस्थेस अधिक गतिमानपणे, दर्जेदारपणे कार्य करण्यासाठी आणि अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, प्रशिक्षक, प्रशिक्षणार्थींसाठी आदर्श असावा या दृष्टिकोनातून या उपक्रमाचे महत्त्व आहे.

## नवोपक्रमाची उद्दिष्टे

संस्थेच्या भौतिक सुविधापैकी अनेक गोष्टींमध्ये बदल घडवून विकासाकडे, विकासाकडून समृद्धीकडे जाण्याचा मार्ग तयार करतांना, एखादा बदल अगदी लहान असू शकतो... पण त्याचा मोठा परिणाम होऊ शकतो, उपयुक्तता मूल्य संवर्धित होवू शकते. या बाबीचा सर्जनशील विचार करून म्हणून **"Mission Towards Excellence" "माझी संस्था - स्वच्छ, सुंदर, हरित संस्था"....** या नवोपक्रमाचे उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नंदुरबार या संस्थेतील विविध भौतिक सुविधा आणि परिसर संदर्भातील विविध समस्या, अडचणी, उणिवा यांचा शोध घेणे.

२. कृती कार्यक्रमाची विविध टप्प्यावर आखणी करून नियोजन करणे.

३. उपरोक्त संदर्भात कालबद्ध व प्रतिमान प्रतिक कार्यक्रमांची आखणी करून उपचारात्मक उपाययोजना करणे.
४. संस्थेच्या कार्यालयाच्या परिसराचे सुशोभीकरण व भौतिक विकास करणे.
५. संस्थेच्या परिसर स्वच्छ, सुंदर, हिरवागार करणे.
६. संस्थेत दर्जेदार व उत्कृष्ट बहुतेक सुविधा निर्माण करून संस्थेची उत्कृष्टतेकडे वाटचाल करण्यासाठी आवश्यक बाबींची निर्मिती करणे.
७. केंद्रशासनाच्या शिक्षण मंत्रालयाच्या शैक्षणिक धोरणानुसार शिक्षक प्रशिक्षण संस्थांना दर्जेदार व उत्कृष्ट करण्यासाठी विशिष्ट निधी (१५ कोटी) उपलब्ध करून दिला जाणार आहे. त्यासाठी असलेल्या पडताळणीत ६० पेक्षा अधिक गुण जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नंदुरबार ला प्राप्त होणे.

## नवोपक्रम नियोजन व कार्यवाहीचे टप्पे

जिल्हयाच्या मनुष्यबळ विकासाची जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था या दोन्ही अंगाने जबाबदारी असणारी आपली मातृसंस्था. संस्थेतील सर्व मानवी व भौतिक घटकांच्या दृष्टिकोनातून या नवोपक्रमाचे नियोजन व कार्यवाहीचे टप्पे खालीलप्रमाणे आहेत.

संस्था प्रमुख मा. प्राचार्य सो. व संस्थेतील सहकारी अधिकारी कर्मचारी सोबत सहविचार सभा

⬇

संस्थेतील भौतिक सुविधांबाबत समस्या, अडचणी, उणीवांचा शोध

⬇

अनेकविध कालबद्ध व गतिमान कृतीकार्यक्रमांचे विविध टप्प्यानुसार नियोजन

⬇

भौतिक विकासाचे प्राधान्यक्रम ठरवून कार्याची दिशा ठरवणे व आखणी करणे

⬇

प्राधान्यक्रमानुसार टप्पेनिहाय भौतिक विकास कार्यक्रम आराखडा

⬇

संस्थेचा भौतिक विकासाची उपचारात्मक उपाययोजना

⬇

भौतिक विकास कार्यक्रमासाठी संबंधित कार्यालय व अधिकारी यांच्या भेटी व पाठपुरावा

⬇

संस्था परिसराचे सुशोभीकरणासाठी आवश्यक बाबींची जुळवाजुळव

⬇

विविध कृती कार्यक्रमाच्या माध्यमातून उपायोजना करून विविध कार्यास प्रारंभ व अंमलबजावणी

⬇

अनेकविध कार्यारंभातून व कार्यक्रमातून भौतिक सुविधा निर्मिती

⬇

संस्थेचा भौतिक विकास व उपचारात्मक परिणाम

⬇

फलनिष्पत्ती सुंदर स्वच्छ व हरित संस्थेची निर्मिती

⬇

"माझी संस्था - स्वच्छ, सुंदर, हरित संस्था"....

⬇

समारोप - संस्थेची वाटचाल "Mission Towards Excellence"

## कार्यवाहीचे स्वरूप

"एकमेका सहाय्य करू अवघे करू संस्थेची उन्नती," "संस्थेची उन्नती, आपली उन्नती", आणि "आला तर आपण सोबत... नाहीतर आपणा शिवाय" या तीन तत्वांचा अंगीकार करून कर्मभूमी असलेल्या मातृसंस्थेत उपरोक्त उद्दिष्टांना साकार करण्यासाठी आणि संस्थेत दर्जेदार व उत्कृष्ट भौतिक सुविधा निर्माण करून उत्कृष्टेकडे वाटचाल करण्यासाठी आवश्यक बाबींची निर्मिती करण्यासाठी संस्थेचे सर्वेसर्वा आणि प्रमुख मा.प्राचार्य डॉ.जगराम भटकर सो. यांच्या प्रेरणेने, मार्गदर्शनाने आणि सहकारी अधिकारी व कर्मचारी यांच्या बौद्धिक आणि शारीरिक श्रम सहकार्यातून संस्थेत भौतिक सुविधा निर्मितीचा विकास आराखडा तयार करण्यात आला. म्हणून **"Mission Towards Excellence" "माझी संस्था - स्वच्छ, सुंदर, हरित संस्था"....** या नवोपक्रमाच्या उद्दिष्टानुसार विविध नियोजन, कृतिकार्यक्रम आणि उपचारात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी करून खालीलप्रमाणे उद्दिष्टनिहाय कार्यवाही करण्यात आली.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नंदुरबार या संस्थेतील विविध भौतिक सुविधा आणि परिसर संदर्भातील विविध समस्या, अडचणी, उणिवा यांचा खालीलप्रमाणे शोध घेवून कृतीकार्यक्रमाचे नियोजन व आखणी करण्यात आली.

१. वृक्षारोपणासाठी जमिनीचे सपाटीकरण करणे.
२. स्वच्छ, सुंदर, हिरवे डायट ची निर्मिती करणे.
३. वॉटर हार्वेस्टिंग करणे.
४. परिसरातील लहान मोठे काटेरी झाडे काढून परिसर स्वच्छ करणे.
५. रस्ता सपाटीकरण व डांबरीकरण करणे.
६. सभागृह हॉल व त्यालगतच्या स्वच्छता गृहांचे बांधकाम पूर्णत्वास नेणे.
७. वातानुकूलीत सभागृह (हॉल) निर्मिती व सुशोभीकरण
८. संगणक कक्ष निर्मिती.
९. स्टोअर / रेकार्ड रूम निर्मिती.
१०. पहिला मजला डक व सिंक दुरुस्ती

११. दुसरा मजला वॉटरप्रूफिंग
१२. प्राचार्य व संगणक कक्ष गळती दुरुस्ती व रंगकाम.
१३. वाळवी व गळती मुक्त इमारत.
१४. सोलर वीज निर्मिती
१५. ध्वजारोहण परिसर फ्लेवर ब्लॉकसह विकसित करणे.
१६. भव्य दिव्य प्रवेशद्वार निर्मिती
१७. नवीन इलेक्ट्रीफिकेशन व प्लमबिंग
१८. तळ जीना स्वच्छता आणि प्रथम मजला जीना बसविणे.
१९. भोजन व मीटिंग कक्ष निर्मिती
२०. वाहनतळ दुरुस्ती व निर्मिती
२१. समावेशित थेरपी कक्ष निर्मिती
२२. लोकसहभागातून मुख्य रस्त्याच्या कडेला वृक्षारोपण
२३. DPDC मधून १० लाखाचा प्रस्तावास मंजुरी, पीडब्ल्यूडी कडून इमारत दुरुस्ती
२४. जिल्हा क्रीडा कार्यालयाकडून आऊटडोर जिमसाठी ६ लाखाचा प्रस्तावास मंजुरी
२५. पीडब्ल्यूडीकडून ३.२१ कोटीचा वाढीव बांधकाम आराखडा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी पाठवला
२६. संस्थेच्या जागा ऑनलाइन ७/१२ उतारा व ऑनलाइन पीआरबी मध्ये नोंद घेणे
२७. सर्व झाडांना ठिबक सिंचनद्वारा पाण्याची सोय.
२८. संस्थेसाठी वाढीव पाच एकर जागा प्रस्ताव
२९. केंद्रशासनाच्या धोरणानुसार १५ कोटी निधीसाठी बांधकाम प्रस्ताव.
३०. डीपीडीसी मधून “लर्निंग वॉकिंग ट्रॅक” आणि “लर्निंग हट” साठी प्रस्ताव.

## उद्दिष्टे, टप्पेनिहाय उपचारात्मक उपाययोजना अंमलबजावणीची फलनिष्पत्ती

**१) जमिनीचे सपाटीकरण व झाडांसाठी खड्डे करणे :-**

यापूर्वी दोन वेळा जेसीबी आणून सपाटीकरण आणि खड्डे खोदण्याचा प्रयत्न परंतु त्यास यश मिळाले नाही हा अनुभव लक्षात घेऊनच मोठा जेसीबी (JCB) आणून कामास प्रारंभ केला. जागा सपाटीकरण व झाडांसाठी खड्डे करतांना योग्य प्रमाणात यश मिळाले.

**२) स्वच्छ, सुंदर, हिरवे डायटची निर्मिती करणे** :-

परिसरात वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन आणि सुशोभीकरण या महत्वपूर्ण कामाचे नियोजन करून **चंदन, रक्तचंदन, फणस, साग, निम, पिंपळ, वड, औदुंबर, पापडी, सिरस, बेहडा, महू, सिसम, निलगिरी, बांबू, सुबाभूळ, आवळा, जांभूळ, पेरू, सीताफळ, कढीपत्ता, चाफा, विविध रंगी गुलाब, जास्वंद, मोगरा, सोनचाफा, कन्हेर, बोगनवेल यासारख्या विविध वृक्षांची व फुलझाडांची लागवड करण्यात आलेली.**

**३) वॉटर हार्वेस्टिंगची निर्मिती -**

वॉटर हार्वेस्टिंगची निर्मितीमुळे मागील पावसाळ्यात हजारो लिटर पाणी साठवण करता आले. याचा फायदा संस्थेला पाणीपुरवठा करणाऱ्या बोअरला होऊन जमिनीतील पाण्याची पातळी वाढली.

**४) परिसरातील लहान मोठे काटेरी झाडे काढून परिसर स्वच्छ करणे -**

संस्थेच्या ६३ आर जागेत अनेक लहान-मोठे काटेरी बाभूळ, मोठे गवत, विविध वनस्पती, गाजर गवतची मोठ्या प्रमाणावर वाढ झाली होती. जेसीबीच्या मदतीने सर्व परिसर स्वच्छ करण्यात आला.

**५) रस्ता सपाटीकरण व डांबरीकरण करणे -**

संस्थेकडे येणाऱ्या मुख्य रस्त्यापासून ते कार्यालयाच्या पायरीपर्यंत रस्त्याचे सपाटीकरण करून रस्ता डांबरीकरण करून घेतला, यामुळे वाहतुकीस येणारा अडथळा दूर होऊन रस्ता डांबरीकरणामुळे परिसराच्या सौंदर्यात अधिक भर पडली आहे.

**६) सभागृह (हॉल) व स्वच्छता गृहांचे बांधकाम पूर्णत्वास नेणे -**

संस्थेच्या इमारतीचा पहिल्या मजल्यावर सभागृह मोठा हॉल व स्वच्छतागृहांचे काम १०० टक्के झाले असून रंगरंगोटी देखील पूर्ण होवून वापर सुरू झाला आहे.

**७) वातानुकूलीत हॉल निर्मिती व सुशोभीकरण:-**

सभागृह हॉलचे विद्‌युतीकरण करून साहित्य व फर्निचरसह हॉल सुसज्ज व सुशोभित करण्यात आला आता 150 शिक्षक व्यक्तींची सहविचार सभा, प्रशिक्षण घेण्यासाठी वातानुकूलित सभागृह/हॉलची निर्मिती करण्यात आली.

**८) संगणक कक्ष निर्मिती :-**

संस्थेत १२ संगणक संचासह वाय-फाय सुविधा, साऊंड स्पीकर्स, प्रिंटर इ.सह उत्तम संगणक कक्षाची निर्मिती करण्यात आली असून याचा वापर आता सुरू आहे.

**९) स्टोअर / रेकॉर्ड रूम निर्मिती :-**

संगणक कक्षातील साहित्य स्वच्छ करून व्यवस्थित ठेवण्यासाठी आणि रेकार्ड सुस्थितीत ठेवण्यासाठी स्टोअर/ रेकार्ड रूमची अतिशय नियोजनबद्‌ध सुंदर अशी रचना करण्यात आली.

**१०) तळमजला डक व सिंक दुरुस्ती :-**

डीपीडीसी मार्फत सुमारे चार लाख रुपये या कामासाठी प्रस्तावित करून मंजूर करून घेण्यात आले व संपूर्ण दुरुस्ती करण्यात आली.

**११) इमारतीच्या पहिल्या मजल्यावर वॉटरप्रूफिंग करणे :-**

डीपीडीसी मार्फत सुमारे सहा लाख रुपये या कामासाठी प्रस्तावित करून मंजूर करून घेण्यात आले व संपूर्ण दुरुस्ती करण्यात आली.

**१२) प्राचार्य व संगणक कक्ष गळती दुरुस्ती व रंगकाम :-**

प्राचार्य आणि संगणकक्ष गळती दुरुस्ती करण्यात आली आणि सुंदर असे रंगकाम करण्यात येवून सुशोभित करण्यात आले.

**१३) वाळवी व गळती मुक्त इमारत :-**

संगणक कक्ष व प्राचार्य कक्ष पेस्ट कंट्रोलच्या साह्याने वाळवीमुक्त आणि इमारत गळती मुक्त करण्यात आली.

**१४) सोलर वीज निर्मिती :-**

संस्थेत ५ KV सोलर सिस्टीम बसवून सद्यस्थितीत दररोज १७ ते २० युनिट वीज निर्मिती होत आहे. यामुळे विज बिलाची रक्कम अल्प प्रमाणात येत असून आर्थिक बचत होत आहे.

**१५) ध्वजारोहण परिसर फ्लेवर ब्लॉकसह विकसित करणे :-**

यू **U** आकारातील इमारतीचा आतील भाग भागात ध्वजारोहण स्तंभ असून हा भाग विकसित करण्यात आले असून सुंदर रंगीत प्लेव्हर ब्लॉक बसवण्यात आले आहेत. यामुळे इमारतीचे सौंदर्य अधिकच खुलून दिसत लागले आहे, ध्वजारोहण परिसर अतिशय देखणा झाला आहे.

**१६) भव्य दिव्य प्रवेशद्वार निर्मिती :-**

संस्थेसाठी सुंदर, भव्य प्रवेशद्वार, त्यावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था व जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था या दोन्हीचे नाव हे अभिमानाचे आकर्षण केंद्र ठरले आहे.

**१७) संस्थेत नवीन इलेक्ट्रीफिकेशन व प्लंबिंग :-**

संस्थेच्या वास्तूत गर्जाधीष्टीत नियोजन करून इलेक्ट्रीफिकेशन व प्लंबिंग नव्याने करण्यात आले, त्यामुळे कार्यालयीन कामात गतीमानता निर्माण झाली. स्वच्छतागृहांसह परिसरातील प्रत्येक दिशेला पाणी उपलब्ध होईल अशी व्यवस्था करण्यात आली.

**१८) तळ मजला जिना स्वच्छता आणि पहिला मजला जिना बसविणे.**

तळमजल्यावरील जिना मार्बल फरशीत तयार हा सुंदर स्वच्छ जिना इमारतीचे वैभव अधिक वाढवतो. पहिल्या मजल्यावरील मधल्या सभागृहाच्या स्लॅबवर लोखंडी जिना तयार करून बसविला, यामुळे स्वच्छतेच्या समस्येसह अनेक समस्या मिटल्या.

**१९) भोजन व मीटिंग कक्ष निर्मिती :-**

भोजन व मीटिंग कक्षेची निर्मिती कार्यालयात आठ ते दहा व्यक्तींची सहविचार सभा किंवा ग्रुप वर्क किंवा टीम वर्क करण्यासाठी एका खोलीचे रूपांतर मीटिंग कक्ष आणि चहापान, भोजन कक्ष आवश्यक ते सर्व फर्निचर व साहित्याने सुसज्ज करण्यात आला आहे.

**२०) वाहनतळ दुरुस्ती व निर्मिती :-**

संस्था परिसरात वाहनतळ जागा समतळ करण्यात आली तर तुटलेले फ्लेवर ब्लॉकची दुरुस्ती करण्यात येऊन वाहनतळ व्यवस्था निर्माण करण्यात आली.

**२१) समावेशित थेरपी कक्ष निर्मिती :-**

समावेशित शिक्षणासाठी विविध दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी थेरपी कक्षाचे साहित्याची स्वच्छता करून सुव्यवस्थितपणे साहित्याची मांडणी करून सुंदर थेरपी कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे.

**२२) लोकसहभागातून मुख्य रस्त्याच्या कडेला वृक्षारोपण :-**

मुख्य रस्ताला लागून लोकसहभागाच्या माध्यमातून संस्थेचा आतील भागाबरोबरच बाह्यपरिसर देखील नयनरम्य झाला.

**२३) DPDC मधून १० लाखाचा प्रस्तावास मंजुरी :-**

पीडब्ल्यूडी कडून इमारत दुरुस्ती डीपीडीसी मधून इमारत दुरुस्तीसाठी दहा लाख रुपये मंजुरी मिळविण्यात यश मिळवले. यात छत वॉटरप्रूफिंग, डक आरसीसी कव्हर, सिंक स्लॅब मध्ये पीसीसी कोबा, खुला डक वर छत टाकून गळती बंद करणे, इमारतीच्या बाहेरील भागात रंगकाम करणे इ. कामे झाली.

**२४) जिल्हा क्रीडा कार्यालयाकडून आऊटडोर जिमसाठी ६ लाखाचा प्रस्तावास मंजुरी :-**

संस्थेच्या खुल्या जागेवरती ओपन जिम, खुली व्यायाम शाळा निर्मिती करण्याकरता जिल्हा नियोजन समितीने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयास सहा लाख रुपयाची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता दिली असून जिम उभारण्यास प्रारंभ झाला आहे.

**२५) ३.२१ कोटीचा वाढीव बांधकाम आराखडा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी :-**

संस्थेच्या भविष्यकालीन कार्यक्रमांचे स्वरूप लक्षात घेऊन सद्यस्थितीतील इमारत अपूर्ण पडत होती. त्याकरिता ३.२१ कोटी रुपयांचे संस्थेच्या वाढीव बांधकाम आराखडा अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे सादर केले आहे.

**२६) संस्थेच्या जागा ऑनलाइन ७/१२ उतारा व ऑनलाइन पीआरबी नोंद घेणे :-**

संस्थेच्या जागेचा ७/१२ उतारा ऑनलाइन उपलब्ध होत नव्हता. त्यासाठी मा.तहसीलदार यांच्याकडून विशेष प्रयत्न करून संस्थेच्या ऑनलाईन ७/१२ उतारा अद्ययावत करून घेतला.

कार्यालयाच्या इमारतीचे कायमस्वरूपी रजिस्ट्रेशन ऑनलाइन पीआरबी ची नोंद करून घेण्यास प्राधान्य देण्यात आले, इमारतीस कायमस्वरूपी रजिस्ट्रेशन (पीआरबी) क्रमांक प्राप्त झाल्यामुळेच इमारत दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध होऊ शकला.

**२७) सर्व झाडांना ठिबक सिंचनद्वारा पाण्याची सोय :-**

संस्थेच्या ६३ आर जागेला संरक्षक भिंत उभारण्यात आली असून या भिंतीला लागून संपूर्ण परिसरात आणि कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ, इमारतीला लागून संपूर्ण जागेत वृक्षारोपण करण्यात आले आहे. या सर्व वृक्षांना पाण्याचे व्यवस्थापन ठिबक सिंचन द्वारे करण्यात आले आहे. त्यामुळे पाण्याची व श्रमाची बचत होवून वृक्षसंवर्धन सुनियोजितपणे केले आहे.

**२८) संस्थेसाठी वाढीव पाच एकर जागा प्रस्ताव :-**

संस्थेच्या भविष्यकालीन कार्यक्रमांचे स्वरूप लक्षात घेऊन सद्यस्थितीतील ६३ आर जागा अपूर्ण/कमी असून केंद्रशासनाच्या धोरणानुसार जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांच्या सक्षमीकरणासाठी विविध भौतिक सुविधा निर्माण करण्यासाठी आणि रु. १५ कोटी निधीच्या प्रस्तावित बांधकाम करण्यासाठी वाढीव अतिरिक्त जागा आवश्यक आहे. त्यासाठी ५ एकर जागा मिळावी म्हणून मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव दाखल करून प्रयत्न सुरु आहेत.

**२९) केंद्रशासनाच्या धोरणानुसार १५ कोटी निधीसाठी बांधकाम प्रस्ताव.**

केंद्रशासनाच्या सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पीय धोरणानुसार शिक्षक प्रशिक्षण दर्जेदार होण्यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांचे सक्षमीकरण करण्यास प्राधान्य देण्यात आले आहे. केंद्रशासनाच्या शिक्षण मंत्रालयाच्या शैक्षणिक धोरणानुसार शिक्षक प्रशिक्षण संस्थांना दर्जेदार व उत्कृष्ट करण्यासाठी विशिष्ट निधी (१५ कोटी) उपलब्ध करून दिला जाणार आहे. त्यासाठी असलेल्या पडताळणीत ६० पेक्षा अधिक गुण मिळवून जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थां, नंदुरबारची निवड झाली असून त्यासाठीचे अंदाजपत्रक आराखडासह प्रस्ताव केंद्राकडे पाठविला आहे.

**३०) डीपीडीसी मधून “लर्निंग वॉकिंग ट्रॅक” आणि “लर्निंग हट” साठी प्रस्ताव.**

संस्थेच्या ६३ आर जागेत अनेक लहान-मोठे काटेरी बाभूळ, मोठे गवत, विविध वनस्पती, गाजर गवतची मोठ्या प्रमाणावर वाढ होते. अनेक दगड गोटे, उंच व सखल भाग विकसित करण्यासाठी पीडब्ल्यूडी कडून “लर्निंग वॉकिंग ट्रॅक” आणि “लर्निंग हट” साठी प्रस्ताव डीपीडीसी मधून मंजुरीसाठी पाठवला आहे.

| **नवोपक्रम पूर्वीचा परिसर** | **नवोपक्रम नंतरचा परिसर** |
|---|---|
|   |  |

**स्वच्छ, सुंदर, हिरवे डायट ची निर्मिती करणे.**





## समारोप

या उपक्रमामुळे संस्थेच्या भौतिक सुविधा पैकी अनेक गोष्टींमध्ये बदल घडवून विकासाकडे त्यातून समृद्ध तिकडे जाण्याचा मार्ग तयार करताना एखादा बदल अगदी लहान असू शकतो पण त्याच्या मोठा परिणाम होऊ शकतो संस्थेत भौतिक सुविधा निर्माण करताना अनेक विथ अडचणी समस्या अनेकविध अडचणी समस्या नियम आर्थिक बाबी प्रशासकीय बाबी यांना सामोरे जावे लागले पण या सर्वांवर योग्य प्रकारे उपाययोजना करून कृती कार्यक्रमांची यशस्वी अंमलबजावणी करता आली नवीन विचार नवीन आशावाद नवीन कल्पनांसह उत्साह जिद्द मैत्री आणि चिकाटी या बळावरच या उपक्रमाची फलनिष्पत्ती साध्य झाली

डायट नंदुरबार ही संस्था शिक्षणाच्या सक्षमीकरणाची प्रशिक्षण शाखा असल्याने संस्थेत प्राथमिक माध्यमिक शिक्षकांची विविध प्रशिक्षण सोबत गुणवत्ता विकासासाठी आवश्यक सर्व प्रकारचे कार्यक्रम उपक्रम राज्य शासनाच्या वतीने जिल्हाभरात राबवले जातात ज्यावेळी सर्व क्षेत्रीय अधिकारी मुख्याध्यापक केंद्रप्रमुख शिक्षण विस्तार अधिकारी गटशिक्षणाधिकारी शिक्षा अधिकारी यांना देखील या उपक्रमाच्या निष्पतीचा लाभ प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे लाभणार आहे.

यशदा मार्फत जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था म्हणून देखील संस्था कार्य पार पडते जिल्ह्यातील सर्व शासकीय वर्गात तीन व चारच्या कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण हे राज्य प्रशिक्षण धोरणानुसार संस्थेत आयोजित केली जातात त्यामुळे या सर्व शिक्षणाची निगडित घटकांना विद्यार्थी पालकांना या उपक्रमाचा लाभ होणार आहे.

या उपक्रमाचे गुणवत्ता विषयक शैक्षणिक आर्थिक व्यवहारीक सामाजिक आणि व्यवहारिक मूल्य हे बहुमोल व अमर्यादित आहे तसेच लाभ घेणाऱ्या घटकांची संख्या व लाभचा कालावधी देखील बहुसंख्या आणि अनिश्चित आहे.

# परिशिष्ट - ४

**नवोपक्रमाच्या कार्यवाहीचे छायाचित्रे.**










**DIECPD अथवा DIET आणि DATI ची इमारत. प्रवेश दि. २६ नोव्हेंबर २०१८**




**स्वच्छ, सुंदर, हिरवे डायट ची निर्मिती करणे.**


## नवोपक्रमापूर्वीचा परिसर




## नवोपक्रमानंतरचा परिसर






चला ऑक्सीजन पेरुया :
लोक चळवळ !
..वृक्षारोपणाच्या चळवळीत कृतीशील सहभागी झाल्याबद्दल आभार..
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था
DIET
नंदुरबार
महाराष्ट्र शासन
" ऑक्सीजन टीम "
- आजचे छायाचित्र -
नंदूरबार : जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेत १०० वृक्ष लागवड करून केली ऑक्सिजन पेरणी.
प्रसंगी अधिव्याख्याता डॉ.राजेंद्र महाजन, डॉ.वनमाला पवार, पंढरीनाथ जाधव, सुभाष वसावे उपस्थित होते.
तसेच या कार्यासाठी अनिल सोनवणे, मनोज खैरनार, पानाजी वळवी, संजय निकम यांनी परिश्रम घेतले



**"Mission Towards Excellence"**

**"माझी संस्था - स्वच्छ, सुंदर, हरित संस्था"....**

**या नवोपक्रमासाठी साथ देणारे शिलेदार**

**सहकारी अधिकारी, कर्मचारी यांचे सोबत**

**"सबका साथ, डायट और सबका विकास" ही नवोपक्रमाची फलनिष्पत्ती.**

**डायट, नंदुरबार स्वच्छ, सुंदर आणि हरित परिसर**



**डायट परिसरातील वृक्षारोपण, भव्य दिव्य प्रवेशद्वार, वातानुकूलीत सभागृह, विविध कक्ष निर्मिती, विविध भौतिक सुविधा, स्वच्छ, सुंदर आणि हरित परिसर, मनमोहक विविध रंगी फुले हे कठोर परिश्रमाची आणि सातत्यपूर्ण साधनेची, या नवोपक्रमाची फलनिष्पत्ती होय.**

# परिशिष्ट - ५

दैनिक
उज्ज्वल
पुलायन जाधव शहादा ग्रामीण प्रतिनिधी
मो.7588317479
स्वतंत्र विचाराचे.. स्वतंत्र व्यासपीठ!

# स्वतंत्र भारत

## प्रत्येकाने वृक्षारोपण कार्यात सहभागी व्हावे -जिल्हाधिकारी मनीषा खत्री



स्वतंत्र भारत

**शहादा ग्रामीण । प्रतिनिधी**

वृक्षारोपण ही काळाची गरज असून, प्रत्येकाने या कार्यात सहभागी झाले पाहिजे, असे प्रतिपादन नंदुरबारच्या जिल्हाधिकारी श्रीमती मनीषा खत्री यांनी केले. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्रांगणात आयोजित वृक्षारोपण कार्यक्रम प्रसंगी त्या बोलत होत्या. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था येथील प्रांगणात जिल्हाधिकारी श्रीमती मनीषा खत्री यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. संस्थेची इमारत, जिल्हास्तरावर सुरू असलेल्या गुणवत्ता वाढीसाठी उपक्रम व परिसरातील वृक्षारोपण पाहून श्रीमती मनीषा खत्री यांनी समाधान व्यक्त केले. परिसरातील उंच टेकड्यावर देखील वृक्षारोपण करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. वृक्षारोपण ही काळाची गरज असून, प्रत्येक व्यक्तीने वृक्षारोपण केले पाहिजे. जेथे जेथे शक्य असेल तिथे तिथे वृक्षारोपण करून वसुंधरेचे रक्षण करण्याची जबाबदारी प्रत्येकाने उचलली पाहिजे, असेही त्या म्हणाल्या. यावेळी डाएटचे प्राचार्य डॉ. जगराम भटकर यांनी श्रीमती मनीषा खत्री मॅडम यांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी वरिष्ठ अधिव्याख्याता प्रवीण चव्हाण,रमेश चौधरी अधिव्याख्याता डॉ. राजेंद्र महाजन,डॉ. वनमाला पवार, डॉ. संदीप मुळे, पंढरीनाथ जाधव, सुभाष वसावे, विषय सहायक देवेंद्र बोरसे,गोविंद वाडीले, श्रीमती रेखा तांबोळी, युजवेंद्र देवरे आदी यावेळी उपस्थित होते.

# पुण्य नगरी

## वृक्षसंवर्धनासाठी प्रत्येकाने जबाबदारी पार पाडावी

### जिल्हाधिकारी ; जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतर्फे वृक्षारोपण



**नंदुरबारः** वृक्षारोपण ही काळाची गरज असून प्रत्येकाने या कार्यात सहभागी झाले पाहिजे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी मनीषा खत्री यांनी केले. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्रांगणात आयोजित वृक्षारोपणप्रसंगी त्या बोलत होत्या. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था येथील प्रांगणात जिल्हाधिकारी मनीषा खत्री यांच्याहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. परिसरातील उंच टेकड्यावरदेखील वृक्षारोपण करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.वृक्षारोपण ही काळाची गरज असून प्रत्येक व्यक्तीने वृक्षारोपण केले पाहिजे, असेही त्या म्हणाल्या. यावेळी डाएटचे प्राचार्य डॉ.जगराम भटकर, वरिष्ठ अधिव्याख्याता प्रवीण चव्हाण, रमेश चौधरी, अधिव्याख्याता डॉ.राजेंद्र महाजन, डॉ. वनमाला पवार, डॉ.संदीप मुळे, पंढरीनाथ जाधव, सुभाष वसावे, विषय सहायक देवेंद्र बोरसे, गोविंद वाडीले, रेखा तांबोळी, यजवेंद्र देवरे आदी यावेळी उपस्थित होते.

Smart Nandurbar Edition
Jan 12, 2023 Page No. 1
Powered by : eReleGo.com

## विविध वृत्तपत्रांनी घेतलेली दाखल


# रयतेचा कैवारी



संपादक - शाहू संभाजी भारती ( डिजिटल शैक्षणिक दैनिक 'रयतेचा कैवारी'- वर्ष तिसरे - अंक २५५) शुक्रवार दि.२२/०७/२०२२ पान ०३


## नंदुरबार जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेत वृक्षारोपण




नंदुरबार दि.२१(रयतेचा कैवारी प्रतिनिधी गोपाल गावीत) जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था तथा जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था नंदुरबार येथील शासकीय इमारतीच्या आवारात नुकतेच वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न झाला. सदर वृक्षारोपण कार्यक्रम जिल्हा शिक्षण व शिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. जगराम भटकर, शिक्षणाधिकारी प्राथमिक सतीश चौधरी, वरिष्ठ अधिव्याख्याता रमेश चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला .

सदर वृक्षारोपणाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रशिक्षणाच्या निमित्ताने उपस्थित ९५ शिक्षकांनी प्रत्येकी एक वृक्ष लावून जिल्ह्याच्या शिक्षणाच्या शिखर संस्थेत वृक्षारोपण केले.

सदर वृक्षारोपण साठी पूर्वनियोजन अधिव्याख्याता डॉ. राजेंद्र महाजन यांच्या संकल्पनेतून झाल्याने अवघ्या पंधरा मिनिटात १०० वृक्षांचे रोपण करून वृक्ष संवर्धनासाठी चा संकल्प पूर्णत्वास आला. सदर वृक्षारोपणा प्रसंगी अधिव्याख्याता डॉ. राजेंद्र महाजन ,डॉ. वनमाला पवार, पंढरीनाथ जाधव, सुभाष वसावे उपस्थित होते.

तसेच या कार्यासाठी अनिल सोनवणे, मनोज खैरनार, पानाजी वळवी, संजय निकम यांनी परिश्रम घेतले. यावेळी शिक्षक बंधू भगिनी उपस्थित होते.


# नंददर्शन


## प्रत्येकाने वृक्षारोपण कार्यात सहभागी व्हावे -मनिषा खत्री



नंदुरबार (प्रतिनिधी) - वृक्षारोपण ही काळाची गरज असून प्रत्येक व्यक्तीने वृक्षारोपण केले पाहिजे. जेथे जेथे शक्य असेल तिथे तिथे वृक्षारोपण करून वसुंधरेचे रक्षण करण्याची जबाबदारी प्रत्येकाने उचलली पाहिजे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी मनिषा खत्री यांनी केले.

नंदुरबार जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्रांगणात जिल्हाधिकारी मनीषा खत्री यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. संस्थेची इमारत व परिसरातील वृक्षारोपण पाहून जिल्हाधिकारी खत्री यांनी समाधान व्यक्त केले. तसेच परिसरातील उंच टेकड्यावर देखील वृक्षारोपण करण्याचे सांगितले. याप्रसंगी डाएटचे प्राचार्य डॉ. जगराम भटकर, वरिष्ठ अधिव्याख्याता प्रवीण चव्हाण, रमेश चौधरी, अधिव्याख्याता डॉ. राजेंद्र महाजन, डॉ.वानमाला पवार, डॉ. संदीप मुळे, पंढरीनाथ जाधव, सुभाष वसावे, विषय सहायक देवेंद्र बोरसे, गोविंद वाडीले, रेखा तांबोळी, युजवेंद्र देवरे आदी उपस्थित होते.


main Edition
2023-01-13 Page No. 1
Powered by : eReleGo.com



## विविध वृत्तपत्रांनी घेतलेली दाखल

## माझे सहकारी, माझे डायट



**“Mission Towards Excellence”**

**“माझी संस्था - स्वच्छ, सुंदर, हरित संस्था”....**

**या नवोपक्रमासाठी साथ देणारे शिलेदार**

**सहकारी अधिकारी, कर्मचारी यांचे सोबत**

**“सबका साथ, डायट और सबका विकास” ही नवोपक्रमाची फलनिष्पत्ती.**

## डायट, नंदुरबार स्वच्छ, सुंदर आणि हरित परिसर



**डायट परिसरातील वृक्षारोपण, भव्य दिव्य प्रवेशद्वार, वातानुकूलीत सभागृह, विविध कक्ष निर्मिती, विविध भौतिक सुविधा, स्वच्छ, सुंदर आणि हरित परिसर, मनमोहक विविध रंगी फुले हे कठोर परिश्रमाची आणि सातत्यपूर्ण साधनेची, या नवोपक्रमाची फलनिष्पत्ती होय.**


आपण दिलेल्या
शुभेच्छांबद्दल
खूप खूप आभार.
असेच प्रेम
यापुढे राहील ही अपेक्षा.
धन्यवाद!